# कामची व्याप्ती

**१) कचरा संकलन**

गोदावरी परिसरातील पसरलेल्या कचरा / निर्माल्य चे संकलन करणे. संकलणाचे फोटो साईटवर अपलोड करणे. **नाशिक महानगरपालिके** मार्फत कचरा / निर्माल्य संबधीत व्यवस्थापण योग्य पद्धतीने हाताळणे.

**२) स्वयंसेवक**

स्वच्छतेची आवड व समाजसेवेची आवड असलेल्या नागरिकांना स्वयसेवक म्हणुन **नाशिक महानगरपालिके** स अर्ज करू शकतात. **नाशिक महानगरपालि**केच्या आदे शांचे पालन करून ते आपले योगदान शहरासाठी देऊ शकतात.

**३) गोदावरी सुशोभिकरण**

गोदावरी परिसरातील सुशोभिकरण जसे पथदीप , बसण्याचे बाकडे , ईत्यादी.. या सगळ्यानची निगा राखणे व नियोजन करणे.

**४) कार्यक्रमांची/उत्सावांची परवानगी**

शहरातील संघटनाची एखादा कार्यक्रम/उत्सव करण्याची ईच्छा असल्यास त्यांनी **नाशिक महानगरपालिके** स अर्ज करून पुर्वपरवानगी घेण्याची यंत्रणा कार्यान्वित करणे.

**५) कार्यक्रमांची/उत्सावांची फोटो पेज**

गोदापरीसरातील झालेल्या कार्यक्रमां चे/उत्सवांचे फोटो व त्या कार्यक्रमातील प्रमुख पाहुण्यांची माहिती तसेच कार्यक्रमांचे विस्तृत विवरण पेज मधे दाखवणे.

**६) विधी**

गोदावरी परिसरात होणाऱ्या परंपरागत सामाजिक होणाऱ्या विधी संदर्भा बाबत नियमावली व वेळ व्यवस्थापन दर्शवणे. विधी संर्दभाबाबत पुर्वपरवानगी घेण्याची यंत्रणा कार्यान्वित करणे.

**७) मंदिर**

गोदावरी परिसरात असलेल्या मंदिरांची ऐतिहासीक माहिती पुरवीणे. मंदिराचे जतन करणे , दिनदर्शकानुसार तेथील उत्सवांची माहिती पुरविणे. पुरपरीस्थीतीत मंदिरांबद्दल सूचना जाहीर करणे.

**८) प्रदुषण**

**“स्वच्छ नाशिक सुंदर नाशिक ”** या प्रकल्पाखाली गोदापरीसरात होणारया प्रदुषण (कचरा/निर्माल्य) बाबत जनजागृती करणे, त्या बाबत नियामवली मांडणे व त्यासाठी व्यवस्थापन करणे.

**९) गंगास्नान**

दिनदर्शकानुसार नियोजित गंगास्नानाच्या तारखेचा बंदोबस्त नियम दर्शविणे व आगामी गंगास्नानाच्या तारखांचे विवरण देणे.

**१०) पुरपरीस्थीती**

पुरपरीस्थीती मध्ये नागरीकांसाठी पुर्वसुचना देण्याचे नियोजित पध्दत बनवणे व त्या सुचना नागरीकापर्यत पोहचवणे. धरण क्षेत्रातुन पाणी सोडण्याची वेळ व किती क्युसेस पाणी सोडणार याबद्दल यंत्रणा कार्यान्वित करणे.

**११) गोदावरी पर्यटण**

गोदावरी नदी लगत **नाशिक महानगरपालि**केने सुरू केलेले गोदापार्क सारख्या प्रकल्पांना चालना देण्याचे नियोजन तसेच नविन मंजुर प्रकल्पांची यंत्रणा बनवणे.

**१२) गणपती विर्सजन**

गणपती विसर्जनादरम्यान होणाऱ्या घाणीचे नियोजन तसेच घरगुती व सार्वजनीक मंडळांना **नाशिक महानगरपालि**केकडून नियमावली वेबसाईटवर दाख विणे.नियम मोडणाऱ्यावर होणाऱ्या कायदेशिर कारवाईबद्दल माहिती करून देणे.

**१३) पुरपरीस्थिती मार्गदर्शन**

पुरपरीस्थिती निर्माण झाल्यास परीस्थिती बद्दलची माहि ती एक पेज वर वेबसाईट मध्ये द्यायची. पुरसंदर्भाबाबतची नियम दर्शविणे.

**१४) फोटो माहिती** (Gallery)

गोदावरी परिसरातील कुंड, मंदिर, निसर्गरम्य स्थळ, **नाशिक महानगरपालि**केकडून करण्यात आलेली कामे या सर्वाचे फोटो साईटवर टाकणे व त्याबद्दलची माहिती उपलब्ध करून देणे.

**१५) दुरदुष्टी** (Vision)

**नाशिक महानगरपालि**केकडून गोदावरी संवर्धनाबाबत भविष्यातील तरतुद व दुरदुष्टी याबाबत जनतेला माहिती उपलब्ध करून देणे.

**१६) उद्दीष्ट** (Mission)

गोदावरी संवर्धनाबाबत **नाशिक महानगरपालि**केकडून करण्यात येणारी कामे व केलेली कामाची उद्दीष्ट जनतेस उपलब्ध करून देणे.

**१७) उपलब्धी** (Achievement)

**नाशिक महानगरपालि**केकडून आजपा वेतो केलेल्या कामाची उपलब्धी नागरिकांपर्यत पोहच विण्याचे काम आपल्या वेबसाईट वरून करण्यात येईल.

**१८) गुगल** (Google Map)

नाशिक शहरातील गोदावरी नदी व लगतच्या **प्राचीन** ऐतिहासिक मंदिरांचे दर्श नास पोहचण्यासाठी आधुनिक पद्धतीने गुगल मॅप वापरून मार्ग दाखवण्याचे काम भाविक व पर्यटकांना केले जाईल.

**१९) बोट क्लब**

गोदावरी नदी पात्रात **नाशिक महानगरपालि**केकडून पुरविण्यात आलेल्या अनेक सुविधांपैकी बोट क्लब हि एक सुविधा आहे. बोट क्लब चा वेळ, बोट राईड साठी लागणारे मुल्य यांची सविस्तर माहिती आपल्या साईटवर पुरविणे.

**२०) अस्थिविर्सजन परवानगी**

VIP लोक जेव्हा अस्थिविर्सजन करण्यासाठी येतात त्यावेळेस जमणा ऱ्या गर्दीचा विचार करून आपण VIP लोकांना येण्याच्या अगोदर पुर्वपरवानगी घेणे आवश्यक असणार.

**२१) फिल्म शुटिंग**

फिल्म शुटिंग करण्यासाठी येणा ऱ्या संघटनांना **नाशिक महानगरपालि**केकडून पुर्व परवानगी घेणे आवश्यक असणार.

**२२) गोदावरीचा इतिहास**

गोदावरी नदिचा ऊगम , विस्तार, महंती या सर्व गोष्टीची माहिती जनसामान्यांना पोहच विण्याच काम आपल्या साईटवरून करण्यात येईल.

**२३) कुंभमेळा**

दर १२ वर्षानी येणा ऱ्या कुंभमेळ्याचे **नाशिक महानगरपालि**केकडून करण्यात आलेले नियोजन व त्यांचे छायचित्र यांचे माहिती दर्शक पेज साईटवरून दाखवण्यात येईल.

**२४) घोषणा पेज**

वेळोवेळी **नाशिक महानगरपालि**केकडून जनतेसाठी तसेच **नाशिक महानगरपालि**केच्या कर्मचाऱ्यांसाठी आपण एक पेज बनवुन देण्यात येईल.

**२५) महाआरती**

गोदावरी नदीवर नित्यनियमानुसार होणा ऱ्या महाआरतीचे वेळेचे तसेच त्याचे नियम समजावे म्हणुन वेबसाईटवर माहिती दर्शविली जाईल.

**२६) नाले सफाई**

पावसाच्या अगोदर तुबणाऱ्या गटारीचे प्रसंग बघता, नालेसफाई बद्दलची माहिती व विवरण दाखवीणे.

| अनु.क्र. | कामाचे नाव | दर |
|---|---|---|
| 1. | गोदावरी संवर्धन कक्ष विभागाचे सेवा तसेच विभागाची माहिती बाबतचे संकेत स्थळ विकसित करावयाचे आहे. उपरोक्त नमूद १ ते २६ बाबींची एकत्रित दर बंद पाकिटात प्रसिद्ध दिनांक ०६/१२/२०२२ पासून दिनांक १२/१२/२०२२ पावेतो गोदावरी संवर्धन कक्ष विभागात दुपारी ३.०० वाजेपर्यंत तळ मजला, राजीव गांधी भवन, मनपा येथे सादर करावे. | |

Sd/-

उप आयुक्त (गो.सं.कक्ष)

नाशिक महानगरपालिका, नाशिक.